जागा आपणांस तंत्रज्ञानाला देता येईल का? अशा प्रकारच्या चर्चा आज नित्य होत आहेत, त्यामुळे या शोधनिबंधाच्या साहाय्याने त्याची चर्चा व्हावी, मंथन व्हावे असे वाटते.

**उद्देश:** गेल्या आठ-दहा वर्षात शिक्षकाच्या भूमिकेबद्दल बरीच चर्चा होताना आपणास दिसते. तंत्रज्ञान विकसित होत आहे, त्यामुळे शिक्षण देखील त्याच्या सहाय्याने देता येणे शक्य झाले आहे. अशा परिस्थितीत शिक्षकाची गरज आहे का? तंत्रज्ञानाने जर शिक्षकाचे कार्य होत असेल तर मग शिक्षक नेमणे गरजेचे आहे का? इथपर्यंत चर्चा रंगतात. अशा या परिस्थितीत शोध पेपरच्या निमित्ताने या विषयाचा अभ्यास करावा म्हणून या विषयाचे चयन केले.

**गृहीतक:**

1) तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेऊ शकणार नाही. व

2) शिक्षकाची गुणवत्ता वाढविण्यासाठी तंत्रज्ञान फार उपयोगी आहे हे शिक्षकाने स्वीकारणे गरजेचे आहे.

ही दोन गृहीतके या पेपरच्या निमित्ताने मी सिद्ध करणार आहे.

**स्पष्टीकरण:** एच. जी. वेल्स म्हणतात, ‘इतिहासाचा वास्तविक निर्माता अध्यापकच असतो.’

प्रो. हुमायू कबीर – ‘चांगल्या शिक्षकांशिवाय सर्वोत्तम शिक्षण प्रणाली देखील अपयशी ठरते. शिक्षण व्यवस्थेतील दोषही चांगल्या शिक्षकांमुळे दूर होऊ शकतात.’

डॉ. राधाकृष्णन यांच्या मते- ‘समाजात शिक्षकाला खूप महत्त्वाचे स्थान आहे. बौद्धिक परंपरा आणि तांत्रिक क्षमता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचवणाऱ्या आणि सभ्यतेची ज्योत तेवत ठेवणाऱ्या धुरीप्रमाणे तो आहे.’ या विधानांवरून स्पष्ट होते की, शिक्षकाची भूमिका ही अत्यंत महत्त्वपूर्ण, जबाबदारीची आहे. पुरातन काळातील शिक्षण प्रणालीचा विचार करता असे लक्षात येते की, शिक्षक हा त्या प्रणालीचा केंद्रबिंदू होता. लौकिक ज्ञानाचा स्त्रोत केवळ शिक्षक हाच होता. पण नंतर मात्र विद्यार्थी हा त्याचा केंद्रबिंदू बनला.

साधारणपणे असे गृहित धरले जाते की, जर व्यक्ती शिक्षक असेल तर तिने आदर्श असलेच पाहिजे. शिक्षकात, जिज्ञासा जागृत असणे, निरंतर अध्ययनशील असणे, वाणीत स्पष्टता, भाषेचे प्रचूरज्ञान, आपल्या विषयाशी संबंधित जास्तीत जास्त ज्ञान सोप्या, सरल भाषेत विद्यार्थ्यांना त्याने अवगत करविणे, स्वतःला सतत नवनवीन ज्ञानाने अद्यावत करणे हे गुण असणे अनिवार्य आहे. शिक्षकासंदर्भात ह्याचं गुणांचा उल्लेख नवीन शिक्षण प्रणालीतही झाला आहे. ह्या गुणांचा समावेश शिक्षकात असतो असे गृहित धरले जात असल्यामुळे शिक्षकाचे स्थान उच्च आहे.

परंतु आपण येथे वास्तविकता लक्षात घेणे गरजेचे आहे. बऱ्याच वेळी परिस्थिती वेगळी असते. शिक्षकात वरील गुणांपैकी काही गुणांचा अभाव असतो. अशा वेळी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास अडचण निर्माण होते. आपल्या ह्या गुणांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांचा विकास होत नाही याची त्याला कधीकधी जाणीव ही नसते. मग प्रश्न निर्माण होतात की, अशा शिक्षकांची गरज

आहे का? किंवा कुठल्या दुसऱ्या साधनाच्या आधारे विद्यार्थाचा विकास शक्य आहे का?

या प्रश्नांची उत्तरे शोधताना आजच्या काळात तंत्रज्ञानाची आठवण आपल्याला होते. ह्या एकविसाव्या शतकाला आपण 'तंत्रज्ञानाचे युग' म्हणून ओळखतो. आपले संपूर्ण जीवन तंत्रज्ञानाने व्यापलेले आहे. अगदी सकाळी उठल्यापासून तर रात्री झोपेपर्यंत आपण तंत्रज्ञानाचा वापर करित असतो. अशा परिस्थितीत शिक्षण क्षेत्र अछुते कसे राहणार? शिक्षण क्षेत्रातही त्याचा वापर सर्रास होत आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे सर्व शिक्षण उपक्रमांना निश्चितच मदत होते. जुन्याकाळी, काळा फळा व पांढऱ्या खडूच्या आधारे शिक्षण दिले जात होते. परंतु ती जागा आज स्मार्ट क्लासरूमने घेतली आहे. शिकविण्याच्या जुन्या पद्धतीत शिक्षक केवळ बोलून शिकवित असे, पण त्याची जागा आज व्हिडिओ, ऑडिओ लेक्चर्स यांनी घेतली आहे. पहिले विद्यार्थ्यांना नोट्स वर्गात लिहून दिल्या जात असत, पण आज त्याच नोट्स पीडीएफ फाइल्स किंवा वर्ड फाईलच्या साह्याने एका क्षणात विद्यार्थ्यांना, मग तो विद्यार्थी कितीही दूर असला तरी क्षणभरात पोहचवल्या जातात. केवळ शब्दांपेक्षा चित्र पद्धतीने आज शिकविले जाते, ज्यामुळे मुलांचे लक्ष अधिक केंद्रित होते आणि विद्यार्थी अधिक आनंदीही होतो. आयसीटीच्या माध्यमातून शिक्षणाच्या कार्यात बदल झाला आहे. ब्लॉक्स, ईमेल चाट्स, व्हिडिओ, ऑडिओ कॉन्फरन्सिंग, सोशल नेटवर्किंग साईट्स यांच्या साह्याने अध्ययनात त्यांना मदत झाली आहे. एक नवीन दिशा त्यांना अध्यनाच्या संदर्भात त्यांना मिळाली आहे. मूकसारख्या ऑनलाइन कोर्सेस मधून त्यांना कुठूनही तसेच कितीही विद्यार्थ्यांना कोर्स करता येणे शक्य झाले आहे. संशोधन करितांना देखील डिजिटल लायब्ररीचा त्यांना फायदा होऊ लागला आहे. विकिपीडिया, एनसायक्लोपीडिया यांचा त्यांना फायदा तंत्रज्ञानामुळेच मिळाला. अनेक प्रकारच्या सॉफ्टवेअरमुळे डाटा ॲनॅलिसिस सोपे झाले, त्यामुळे आपोआपच संशोधनाचा दर्जा सुधारला आहे. ऍडमिशन, परीक्षेचे पेपर तपासणे, मूल्यांकन करणे यात देखील तंत्रज्ञान मदत करित आहेच. अगदी दुर्गम जागांवर देखील आयसीटीच्या माध्यमाने विद्यार्थी अभ्यास करण्यास सक्षम होऊ लागले आहेत. हे सगळे फायदेचे शिक्षण क्षेत्रात माहितीच्या तंत्रज्ञानाने झाले हे आपल्याला स्वीकारलेच पाहिजे. जिथे विद्यार्थ्यांसाठी शिक्षक हेच ज्ञानाचे एकमेव स्त्रोत होते तेथे आज इतके पर्याय त्यांना उपलब्ध आहेत. ही जमेची बाजू आहे हे स्वीकारले पाहिजे. त्याच बरोबर हे ही मान्य केले पाहिजे की, ह्या तंत्रज्ञानाचा फायदा शिक्षकाने घेतलाच पाहिजे कारण असे शिक्षकाने केले नाही तर त्याची स्वतःचीच प्रगती अपूर्ण राहील आणि असा शिक्षक विद्यार्थ्यासमोर कमकुवत ठरेल. त्यामुळे त्याने स्वतःला यात अद्ययावत केलेच पाहिजे.

ह्या सर्वच गोष्टींचा अनुभव आपण कोरोनाच्या काळात विशेष घेतला. कोरोना काळात आपण अध्ययन आणि अध्यापन याचे कार्य तसेच मूल्यमापन देखील केले आणि मग पुन्हा प्रश्न निर्माण झाला की तंत्रज्ञानाच्या या युगात शिक्षकाची गरज आहे का?

पण आपण येथे हे विसरता कामा नये की, हे तंत्रज्ञान शेवटी एका व्यक्तीने म्हणजेच शिक्षकानेच हाताळले. तंत्रज्ञान ही एक भौतिक गोष्ट असून शिक्षक हा ओल्या मातीला आकार देतो, चैतन्य असलेल्या व्यक्तीला आकार देतो त्यामुळे त्या विद्यार्थ्यांच्या भावनांपर्यंत पोहोचण्याची क्षमता ही गॅझेटमध्ये नाही तर जिवंत व्यक्तीत म्हणजेच त्या शिक्षकांतच असू शकते. न्यू एज्युकेशन पॉलिसी प्रमाणे, या शिक्षणप्रणालीचा उद्देश उत्तम व्यक्ती तयार करणे हा आहे. उत्तम व्यक्ती म्हणत असताना त्यात त्या व्यक्तीला तर्कसंगत विचार करता

आला पाहिजे, आपल्या कार्यात सक्षम ती बनली पाहिजे, व्यक्तीत करुणा, सहानुभूती, साहस, शौर्य, लवचिकता या गुणांचा विकास झाला पाहिजे, वैज्ञानिक चिंतन आणि रचनात्मक कल्पनाशक्ती, नैतिक मूल्य या सगळ्या गोष्टी त्यात विकसित झाल्या पाहिजेत, हे अपेक्षित आहे. या गुणांचा विकास हा तंत्रज्ञान करू शकणार नाही तर प्रत्यक्ष शिक्षकाची गरज तिथे आहे, त्यामुळे नवीन एज्युकेशन पॉलिसीप्रमाणे देखील तंत्रज्ञानाबरोबर शिक्षकाचे स्थान त्यांनी स्वीकारलेले आहे. जीवन जगताना आवश्यक असणारे गुण, साहस, धैर्य, संयम, चिंतन हे शिक्षकच विद्यार्थ्यांच्या मनात रुजवू शकतात. एका गॅझेटच्या सहाय्याने ते शक्य नाही. नेतृत्व, खेळाडूवृत्ती या गुणांचा विकास शिक्षकच करू शकतो त्यामुळे त्याला पर्याय नाही हे निश्चित आहे पण त्याच बरोबर तंत्रज्ञानाचा वापर अध्यापनात व्हायलाच हवा हे ही तेवढेच सत्य आहे.

**निष्कर्ष:** थोडक्यात असे म्हणता येईल की, तंत्रज्ञान शिक्षकाची जागा घेऊ शकत नाही, पण शिक्षक आणि विद्यार्थांच्या प्रगतीत तंत्रज्ञानाचा वाटा सिंहाचा असेल.

**संदर्भ:**


- https://www.azquotes.com/quote/602446
- http://www.gangainstituteofeducation.com/NewDocs/dec-2016/Ms_Rekha_Rani_ATTITUDE%20TOWARDS_TEACHING_PROFESSION_OF_PROSPECTIVE_TEACHERS_IN_RELATION_TO_CERTAIN_DEMOGRAPHIC_VARIABLES.pdf
- http://www.gangainstituteofeducation.com/NewDocs/dec-2016/Ms_Rekha_Rani_ATTITUDE%20TOWARDS_TEACHING_PROFESSION_OF_PROSPECTIVE_TEACHERS_IN_RELATION_TO_CERTAIN_DEMOGRAPHIC_VARIABLES.pdf
- https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/NEP_final_HINDI.pdf
- 14677138399. Priya Kale.pdf 14677138399. Priya Kale.pdf
- Lokavishkar International E-Journal, ISSN 2277-727X, Vol-I, Issue-IV, Oct-Nov-Dec2012 w w w . l i i r j . o r g I S S N 2 2 7 7 - 7 2 7 X Page 192 “kS{kf.kd lq/kkj.ka “kS{kf.kd lq/kkj.kaklkBh ekfgrh ra=Kkukpk okij klkBh ekfgrh ra=Kkukpk okij klkBh ekfgrh ra=Kkukpk okij unkQ jfQd uq:Ìhu izoDrk& Jherh dk”khckbZ uoy s bfUVV;wV vkWQ ,T;qds”ku ¼ch-,M~½ dksa
- Vol-2 Issue-1 2017 IJARIIE-ISSN(O)-2395-4396 C-1307 www.ijariie.com 155 RESEARCH PAPER ON “E-CONTENT REPLACE THE NEED OF TEACHER” Dr. M. K. MANDORA1 Dr. M.K.Mandora1 , Department Of Physical Education and Sports, Shri R.K.Parikh Arts and Science College, Petlad. Gujarat University, Ahmedabad-380009


**Cite This Article:**

*सौ. वर्षा नितीन जपे , (2022)* तंत्रज्ञान हे शिक्षकाला पर्याय नसून शिक्षकाच्या प्रगतीस सहाय्यक, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,*** *Volume No XI (Special Issue-I), 168-171*